महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.१४७/एसएम-२ दिनांक:- २८ मार्च, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,
**अध्यक्ष / सचिव,**
**श्री नारायण मंदिर समिती,**
**श्री नारायण नगर, पी.एल. लोखंडे मार्ग,**
**चेंबुर, मुंबई.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...
**श्री नारायण मंदिर समिती, मुंबई संचलित एस. एन. जी. इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट क्र. १, सेक्टर २१, उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड.**

**संदर्भ-**इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.१४७/एसएम-२, दिनांक ०७.०६.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **श्री नारायण मंदिर समिती, मुंबई** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **एस. एन. जी. इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट क्र. १, सेक्टर २१, उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यतेकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन **श्री नारायण मंदिर समिती, मुंबई** संचलित **एस. एन. जी. इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट क्र. १, सेक्टर २१, उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी -**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, रायगड.
७. निवड नस्ती एसएम-२ (१४७/२१).

II Shivtirth II

Shikshan Vibhag Prathamik

Raigarth Jhila Parishad, Alibag

Ma.Kr.rajip/Pra.Shikshan/Aastha-23/RTE-Manayta/2023/3976 Date : 03.10.2023

Respected,

President/Secretary,

Shri. Narayan Mandir Samiti, Mumbai

Subject: - For the purpose of section 18 of the Employers' Right to Free and Compulsory Education Act, 2009, rule 11 of the Employers' Right to Free and Compulsory Education Rules, 2011. Regarding the grant of recognition certificate to schools under sub-rule (4).

Dear Sir/ Ma'am,

In respect of your application dated 18/07/2023 and subsequent correspondence with the school/inspection made to the school in this regard also from the Education Officer (Primary) Raigad Zilla Parishad, Alibaug dated 18/07/2023 to 17/07/2026 for a period of three years. 1st to 8th SNG International School, Plot no. 1 Sector 21 Ulve Nod. Panvel Distt. Raigad Medium English (CBSC) is provisionally approving the school (name of the school with address). The above approval is subject to fulfillment of the following conditions :-

1) The period of recognition shall not be extended and there shall be no obligation under any circumstances to grant recognition or contiguity after Class VIII.
2) The Free and Compulsory Education of Children Act, 2009 (Schedule One) and the Maharashtra Free and Compulsory Education of Children Act 2009
3) The school will give admission to the weaker sections of the nearest and disadvantaged groups, in the first class, to a minimum of 25% of the number of students in that class and will provide them free and compulsory education till the completion of primary education, but more so, this standard will also be complied with in the case of pre-primary classes.
4) A separate bank account shall be provided to the school for receiving the reimbursement due to the children specified in paragraph 3 as per section 12(2) of the Act.
5) The institution/school shall not charge any capitation fee and shall not compel the child or his or her parent or guardian for any screening procedure.
6) No child shall be denied admission to school for want of proof of age, religion, caste or race, place of birth or any of these.
7) (1) No child admitted to a school shall be retained in the grade in which he belongs or expelled from the school until the completion of primary education.
   (2) No child shall be subjected to corporal punishment or mental torture.
   (3) No child shall be required to pass the examination of any board until primary education.
   (4) Every child who has completed primary education shall be given a certificate prescribed under rule 23.
   (5) Students with disabilities/special needs will be included as per the provisions of the Act.
   (6) Teachers possessing the minimum qualification prescribed under section 23 (1) of the Act shall be appointed, provided further that teachers possessing the minimum qualification on the date of commencement of the Act shall have acquired such minimum qualification for a period of five years.
   (7) The teacher shall perform his/her duties specified in section 24 (1) of the Act
   (8) The school shall ensure that the teacher does not engage himself/herself in private teaching work.
8) The school shall follow the syllabus prepared on the basis of the syllabus prescribed by the collective authority.
9) The school shall admit students against the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act.

10) The school shall follow the norms and standards specified in section 19 of the Act. Following are the facilities available in the school at the time of last inspection

- Area of school premises - 3921.5 knots
- Total Construction area - 3921.5 Sq. mtr.
- Area of the playground - 4000 sq. mtr.
- No. of classrooms - 23 Nos.
- Opened the office-ni-store-ni-headmaster's office - Yes
- Separate toilets for boys and girls where there is sufficient water for use and to keep the toilets in a clean and hygienic condition. - Yes
- Drinking water facility - Yes
- Kitchen to cook Lunch - No
- Availability of teaching study materials/ sports materials/Library
- Free availability for reading Material - Yes

11) Unapproved class or classes, in the name of the school, in the school premises or elsewhere, shall not be conducted.

12) The school building or other structure or playground shall be used only for the education purpose and skill development.

13) The School Societies Registration Act, 1960 (21 of 1860) or the Bombay Public Trustees Act, 1950 being run through an organization registered.

14) School is not running for the benefit of any person or group of persons or any other association of persons or any other person or for making any profit.

15) The accounts of the school should be audited and certified by a Chartered Accountant and proper accounts should be prepared as per rules. A copy of each account statement should be sent to the District Education Officer every year.

16) The accreditation code received by your school is RTE. Please note that while making any correspondence with this office, please mention it.

17) The school should submit such reports and information as the Director of Education / District Education Officer may demand from time to time or follow the instructions given by the Government or the local authority for the continued fulfillment of the school's accreditation standards or to rectify the deficiencies in the functioning of the school.

18) To ensure that the registration of the organization is renewed, if any.

Yours faithfully

(Punita Gurav)
Education Officer (Primary)
Raigad Zilla Parishad, Alibaug

NOTARY ★ GOVERNMENT OF INDIA ★ KISHORE V. DAKE CHUNABHATTI, SION, MUMBAI MAHARASHTRA STATE REGN. No. 7337 Expiry Date 10.12.2028

ATTESTED BY ME
K. V. DAKE B.Com. LL.B.
NOTARY GOVT. OF INDIA
Advocate High Court. Mumbai
Janta Market, Shop No 35,
Near Chembur Rly. Station, Chembur.
Mumbai-400 071.

20 APR 2024